# बँकेची ५९ वी

# वार्षिक सर्वसाधारण सभा

# गुरूवार दि. ०७/०९/२०१७ चे इतिवृत्त

# इतिवृत्त

**बँकेची ५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा**
**गुरूवार, दिनांक ०७ सप्टेंबर २०१७ चे इतिवृत्त**

बँकेची ५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे प्रशासकीय कार्यालय, ए—१६, औद्योगिक वसाहत, पद्मश्री बाबुभाई राठी चौक, नेताजी सुभाषचंद्र बोस मार्ग, औद्योगिक वसाहत, सातपूर, नाशिक—४२२००७ येथे गुरूवार, दि. ०७/०९/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजतां बँकेचे प्रशासक श्री.जे.बी. भोरिया यांचे अध्यक्षतेखाली सुरु झाली. सदर सभेचा वृत्तांत खालील प्रमाणे —

सदर सभेस एकूण ४८३ सभासद हजर होते.

सर्व प्रथम बँकेचे प्रशासक श्री.जे.बी. भोरिया यांनी सर्वांचे स्वागत करुन सभेस उपस्थित राहिल्याबदद्ल आभार मानले.

मा.प्रशासक यांनी मिटींग सुरु करणेची अनुमती मागुन सभेला सुरुवात केली. नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री दीपक ठाकूर यांनी अहवाल वर्षात जे थोर शास्त्रज्ञ, राजकीय, सामाजिक, सहकार, कला व साहित्यीक क्षेत्रातील कार्यकर्ते, बँकेचे सभासद, ठेवीदार, खातेदार, सेवक, ज्ञात—अज्ञात जे पंचतत्वात विलीन झाले त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सभेने दोन मिनीटे उभे रहावे अशी विनंती केली. त्यानंतर सभेने आपली भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

बॅकेचे प्रशासक मा.श्री.जे.बी भोरिया यांनी सभेस प्रास्ताविक सादर केले. त्यांनी बॅकेची ३१ मार्च २०१७ अखेरची गुणात्मक व संख्यात्मक प्रगती विविध पैलुंच्या माध्यमातून सादर करुन बॅकेची आर्थिक परिस्थिती सभेसमोर मांडली ती पुढील प्रमाणे :—

दि.३१ मार्च २०१६ अखेरीस असलेला बॅकेचा राखीव निधी वर्षभरात वाढून रूपये ३३७ कोटी ९२ लाखावरून रूपये ३७८ कोटी ०५ लाख इतका झाला आहे. भांडवल पर्याप्तता प्रमाण (सीआरएआर) आणि राखीव निधी (रिझर्व्ह फंड) यात झालेली लक्षणीय वाढ हे बॅकेच्या प्रगतीचे व सक्षमतेचे द्योतक आहे.

अहवाल वर्षात बॅकेच्या ठेवींमध्ये समाधानकारक वाढ झालेली असून ढोबळ एनपीए १५ टक्के आणि निव्वळ एनपीए शून्य टक्के आहे.

या आर्थिक वर्षात बॅकेने रूपये ३७.६८ कोटी विक्रमी निव्वळ नफा कमावलेला आहे.

प्रास्ताविकानंतर श्री.दीपक ठाकूर यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले. विषयपत्रिकेचे वाचनानंतर अहवालातील मुद्रणदोष दुरुस्ती वाचन बँकेचे मुख्य लेखापाल संघमित्रा काळे यांनी पुढील प्रमाणे केले.

| अ.क्र. | पान नं. | दुरुस्ती |
|---|---|---|
| १ | १ | दि.३१.०३.२०१७ अखेरच्या मराठी वार्षिक अहवालातील पान क्र १ वरील वार्षिक सर्व साधारण सभेची नोटीस या मधील विषयपत्रिकेतील विषय क्र ५ दि. ३१.०३.२०१७ अखेर अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे याऐवजी विषय क्र ५ दि.३१.०३.२०१७ अखेर बोनस व सानुग्रह अनुदान आणि अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे असे वाचावे. |
| २ | २ | दि.३१.०३.२०१७ अखेरच्या वार्षिक अहवालातील दृष्टीक्षेपात ठळक बाबींमधील क्र ६ नफा (करोत्तर) रू ३७६८.२९ लाख ऐवजी रू ३७६८.२१ लाख असे वाचावे. |
| ३ | २२ | दि. ३१.०३.२०१७ च्या वार्षिक अहवालातील बँक स्थापने पासुन प्रगती दर्शक सांपत्तिक बोलके आकडे या तक्त्यामधील वर्ष २०१५—१६ चे दिलेली कर्जे रू ९३२८७२ हजार ऐवजी रू ९३९२८७२ हजार असे वाचावे. |
| ४ | २३ | दि.३१.०३.२०१७ च्या वार्षिक अहवालातील दि.३१.०३.२०१७ अखेर बँकेची आर्थिक स्थिती या तक्त्यामधील अ.नं. १० निव्वळ नफा हा रू ४०५८.२१ लाख ऐवजी रू ३७६८.२१ लाख असे वाचावे. |
| ५ | २४ | पोटनियम दुरूस्ती मध्ये दुरूस्तीनंतरचा पोटनियम यामध्ये बँकेचे नाव दि नाशिक मर्चंटस् को.ऑपरेटिव्ह बँक लि.नाशिक ऐवजी नाशिक मर्चंटस् को.ऑपरेटिव्ह बँक लि. असे वाचावे. |

वार्षिक अहवालातील मुद्रणदोष दुरुस्ती वाचनानंतर सभेच्या कामकाजाला रितसर सुरुवात करण्यात आली व विषयपत्रिकेत दिलेल्या अनुक्रमानुसार सर्व विषयांवर सभेत चर्चा झाली. त्याचा सविस्तर तपशिल पुढील प्रमाणे आहे.

**विषय क्र.१** मागील सभा दिनांक १७ सप्टेंबर २०१६ रोजीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**ठराव क्र.१** मागील सभा दिनांक १७ सप्टेंबर २०१६ रोजीचे इतिवृत्त सभास्थानी सर्व सभासदांसाठी उपलब्ध करून दिले. या विषयावर चर्चा करतांना मागील सभेचे वेळी सभासदांनी निवडणुक घेण्याबाबत मागणी केली होती. त्याचा उल्लेख या इतिवृत्तात करून निवडणुक घेण्याबाबत हया सभेमध्ये सुध्दा मागणी केली असा ठराव करून आरबीआयला कळविण्यात यावे असे ठरले. विजय बोरा यांचा विरोध नोंदवून इतिवृत्त मंजूर करण्यात आले.

सुचक – श्री.भणगे माधवराव
अनुमोदक – श्री.शिरोडे श्रीकृष्ण
ठराव बहुमताने मंजुर

**विषय क्र.२ सन २०१६–२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवालाबाबत विचार विनिमय करणे.**

**ठराव क्र.२** सन २०१६–२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल बँकेचे मुख्य लेखापाल संघमित्रा काळे यांनी सभेपुढे सादर केला. त्यावर सविस्तर चर्चा करण्यात येवून सदरचा अहवाल योग्य व बरोबर असल्याने कायम करण्यात यावा असे ठरले.

सुचक – श्री. देवरे सुखदेव
अनुमोदक – श्री. शिंदे ज्ञानेश्वर
ठराव बहुमताने मंजुर

**विषय क्र.३** दि.३१ मार्च २०१७ अखेरची आर्थिकपत्रके, ताळेबंद, नफा–तोटा पत्रक यावर विचार विनीमय करणे व मान्यता देणे.

**ठराव क्र.३** दि. ३१ मार्च २०१७ अखेरची आर्थिकपत्रके, ताळेबंद, नफा– तोटापत्रक व त्या सोबतची परिशिष्टांची माहिती बँकेचे मुख्य लेखापाल संघमित्रा काळे यांनी सभेला दिली. त्यावर सभेत चर्चा झाली. चर्चा सुरू असतांना कमिटमेंट चार्जेस बाबत सभासदांनी विचारणा केली त्यास मा.शेलार साहेबांनी सांगितले की कमिटमेंट चार्जेस हे कर्ज न वापरणाऱ्या म्हणजे ७५ टक्यापेक्षा कमी कर्ज वापर करणाऱ्या कर्जदारांनाच लावले जातात आणि ते योग्य आहे

बँकेची आर्थिकपत्रके, ताळेबंद, नफा–तोटापत्रक व त्या सोबतची परिशिष्टे यावर चर्चा होऊन त्यास मान्यता देण्यांत आली.

सुचक : श्री.शेलार गजानन
अनुमोदक – श्री.बोरसे विकास
ठराव बहुमताने मंजुर

**विषय क्र.४** नफा वाटणी व १५ टक्के लाभांश वाटपास (भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मंजूरी नंतर) मान्यता देणे.

**ठराव क्र.४** बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.दीपक ठाकूर यांनी अहवाल पान नं. ०२ वर छापलेली नफावाटणी जी बँकेने दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी तयार केली आहे, ती सभेस वाचून दाखविली.

२० टक्के डिव्हीडंड मिळाला पाहीजे असे सभासदांनी सुचविले. याबाबत रिझर्व्ह बँकेकडे पत्रव्यवहार करण्यात यावा असे ठरले. त्यास मान्यता देण्यात आली.

सुचक : श्री. गवळी मधुकर
अनुमोदक : श्री. भालेराव अजित
ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र.५** दि. ३१ मार्च २०१७ अखेर बोनस व सानुग्रह अनुदान आणि अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.

**ठराव क्र. ५** बँकेच्या सहाय्यक सरव्यवस्थापक अमृता साठे यांनी सन २०१६ –२०१७ या आर्थिक वर्षात अंदाज पत्रकापेक्षा जादा खर्च झालेला नसल्याची माहिती सभेला दिली. अंदाजपत्रकानुसार बँकेचा खर्च रु.२५८ कोटी ३० लाख इतका होता परंतू प्रत्यक्षात हा खर्च रु.२३३ कोटी ३३ लाखाचा झाला आहे. बोनस व सानुग्रह अनुदान आणि खर्चास मान्यता देऊन उपस्थित सर्व सभासदांनी मा.प्रशासकांच्या सुयोग्य नियोजनाचे अभिनंदन करून समाधान व्यक्त केले.

सुचक : श्री. जाधव सतिश
अनुमोदक : श्री. भोळे दिलीप
ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र.६** सन २०१७—२०१८ सालाच्या खर्चाच्या अंदाज पत्रकाला मान्यता देणे.

**ठराव क्र.६** बँकेच्या मुख्य लेखापाल संघमित्रा काळे यांनी वार्षिक अहवाल पान नं. २१ वर नमुद केलेली सन २०१७—२०१८ सालाच्या अंदाज पत्रकाबाबतची माहिती सभेला वाचुन दाखविली. आधुनिक सॉफ्टवेअर घ्या अशी सुचना करून त्यावर चर्चा करण्यात येऊन खर्चाच्या अंदाजपत्रकाला मान्यता देण्यांत आली.

सुचक : श्री. भटेवरा सागर
अनुमोदक : श्री.सोनवणे हिम्मतराव
ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र. ७** सन २०१६—२०१७ च्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालाची व त्यांच्या पूर्तता अहवालाबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. ७** बँकेचे मुख्य व्यवस्थापक श्री. रविंद्र कानडे यांनी सन २०१६—२०१७ या सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकांनी तयार केलेला व बँकेला प्राप्त झालेला वैधानिक लेखापरिक्षण अहवाल तसेच त्याबाबत बँकेने तयार केलेल्या दोषदुरुस्ती अहवालाचे वाचन केले. बँकेला ऑडीट वर्ग “अ” मिळाला आहे.
त्यावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात येऊन हे दोनही अहवाल योग्य व बरोबर असल्याने त्यांची नोंद घेण्यात आली.

सुचक : श्री. नंदलाल पारख
अनुमोदक : श्री. लासुरे हरीभाउ
ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र. ८** सन २०१७—२०१८ या वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविण्याचा अधिकार प्रशासकांना देणे.

**ठराव क्र. ८** बँकेचे प्रशासक श्री जे.बी.भोरिया यांनी सन २०१७—२०१८ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकाचे नेमणूकी बाबतची सविस्तर माहिती सभेला दिली. त्यावर चर्चा करण्यात आली. त्यानुसार सन २०१७—२०१८ या वर्षासाठी बँकेचे वैधानिक लेखा परिक्षक म्हणून सनदी लेखापाल मे.जयेश देसले ॲण्ड कंपनी यांची नियुक्ती करण्यात यावी असे ठरले. तसेच त्यांचे मानधन ठरविण्याचा अधिकार प्रशासक श्री जे.बी.भोरिया यांना देण्यात आले.

सूचक : श्री नितीन धात्रक
अनुमोदक : श्री नंदलाल पारख
ठराव बहुमताने मंजुर

**विषय क्र. ९** सन २०१८—२०१९ या वर्षासाठी कंकरंट ऑडीटर्सच्या नेमणूकीचा अधिकार प्रशासकांना देणे.

**ठराव क्र. ९** सन २०१८—२०१९ या वर्षासाठी बँकेच्या कंकरंट ऑडीटर्सच्या नेमणूकी बाबतचे सर्वस्वी अधिकार प्रशासकांना देण्यांत यावेत असे ठरले.

सुचक : श्री. कुमट मोहनलाल
अनुमोदक : श्री. करंजकर पांडुरंग
ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र.१०** संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

**ठराव क्र.१०** संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबतची माहिती तसेच सध्या कोणीही संचालक व्यक्तीगत अथवा त्यांचे नातेवाईक स्वत: थकबाकीदार नाहीत याची माहिती सभेला देण्यात आली. त्याची नोंद घेण्यात अली.

सुचक : श्री. संचेती बालचंद
अनुमोदक : श्री. चौधरी अनिल
ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र. ११** **पोटनियम दुरूस्ती बाबत विचार विनिमय करून मान्यता देणे.**

**ठराव क्र. ११** बँकेच्या सन २०१६—२०१७ च्या अहवालातील पान क्र. २४ वरील पोटनियम क्र. १ यातील प्रस्तावित दुरुस्ती मसुदा बँकेचे प्रशासक श्री जे.बी.भोरीया यांनी सभेला वाचून दाखविला.
पोटनियम क्रमांक १ चे दुरुस्ती बाबत विचार विनीमय करण्यात आला. त्यानुसार सदरची प्रस्तावित दुरुस्ती योग्य व बरोबर असल्याने सभेने त्यांस मंजूरी दिली. तसेच सदर पोटनियम दुरूस्तीचे प्रकरण तयार करून ते मा.केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, कृषी मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडे मंजूरीसाठी पाठविण्यात यावे आणि या कामी आवश्यक त्या कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्याचे अधिकार बँकेचे मुख्य

कार्यकारी अधिकारी श्री दीपक गणपत ठाकूर व सहाय्यक सरव्यवस्थापक अमृता आनंद साठे यांना संयुक्तपणे देण्यात यावेत असे ठरले.

सूचक – श्री.रहाळकर सुर्यकांत
अनुमोदक – श्री.बोरा विजय
ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र.१२** **बॅंकेचा प्रचार व प्रसार वाढविण्यासाठी बॅंकेचे संक्षिप्त नाव (नामको बॅंक) लोगोसहीत वापरण्यास मंजुरी मिळण्याबाबत.**

**ठराव क्र. १२** बॅकेचे संक्षिप्त नांव "नामको बॅक" लोगो, पत्र, स्टेशनरी, नामफलक इत्यांदीवर वापर करण्याबाबत बॅकेचे ग्राहक व सामान्य जनता फार पुर्वीपासुन आग्रही आहे. कारण दैनदिन वापरात /व्यवहारात बॅकेला 'नामको बॅक' या नावांने फार पुर्वीपासुन संबोधत आहेत. हे नांव बोलण्यांस व लक्षात ठेवण्यांस सोपे आहे तसेच सध्या संक्षिप्त नांवाकडे कल आहे. म्हणुन बॅकेचे नांव 'नामको बॅक'. असे लोगोसहीत, पत्र, स्टेशनरी, नामफलक इत्यांदी वर वापरावे असे बॅकेच्या ग्राहकांनी व सभासदांनी मनोदय व्यक्त केले आहेत. ठराव सर्वानुमते मंजुर.

सुचक – श्री. कातकाडे उत्तम
अनुमोदक – श्री. बर्वे शंकरराव
ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र. १३ आकस्मिक व धर्मदाय निधी इतर निधीमध्ये वर्ग केल्याची नोंद घेणेबाबत.

ठराव क्र. १३ बॅंकेच्या मुख्य लेखापाल संघमित्रा काळे यांनी बॅंकेच्या धर्मदाय निधीतुन रक्कम रू ४३ लाख ९० हजार रिझर्व्ह फंडात वर्ग केल्याची माहिती सभेला दिली. धर्मदाय निधीची तरतुद ही नियमानुसार केलेली आहे असे मा प्रशासक साो. यांनी सांगितले त्याची नोंद घेण्यात आली.

सुचक – श्री. पवार नरेंद्र
अनुमोदक – श्री मोराडे संतोष
ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र. १४** ५९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला गैरहजर असलेल्या सभासदांची गैरहजेरी माफ करणे बाबत.

ठराव क्र १४ मल्टी स्टेट को—ऑप. सोसायटी ॲक्ट २००२ चे कलम २९/क नुसार जे सभासद सलग तीन वार्षिक सर्वसाधारण सभांना गैरहजर असतील त्यांची गैरहजेरी माफ करण्याविषयीचे आवाहन बॅंकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री दीपक ठाकूर यांनी सभेला केले. त्यांस सभेतील सर्व सभासदांनी मंजूरी दिली. त्याप्रमाणे सलग तीन सभांना गैरहजर असणाऱ्या सभासदांची गैरहजेरी माफ करण्यात यावी असे ठरले.

सुचक –श्री.जातेगावकर जयप्रकाश
अनुमोदक – श्री.कडलग निवृत्ती
ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र. १५** **मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.**

ठराव क्र. १५ १) बॅंकेच्या वसुलीच्या अधिकारास बाधा न येता १००% तरतुद असलेली कर्जे निर्लेखित करणेबाबत विचार करणे.

याबाबत सभेला माहिती देण्यात आली. सदरचा जमाखर्च हा वसूलीच्या अधिकारास बाधा न येता १००% केलेली ही तरतुद आहे. भविष्यात आपणास सदर कर्जाबाबत काही वसुली येण्याची शक्यता निर्माण झाल्यास त्यानुसार ती वसुली करण्याचा अधिकार राखुन ही मंजुरी आपण घेत आहोत. त्या मुळे सदर रक्कम ही कोणालाही आपण माफ करत नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी. यासाठी प्र.म.सभा दि. २६/१२/२०१६ रोजीच्या ठराव नुसार १००% तरतुद असलेली निर्लेखित कर्जे खाते १ श्री वायाळ रमेश रामदास श्रीरामपुर शाखा असुन त्याची रक्कम रू ७,६१,५४३.३५ यास मान्यता देण्यात आली आहे. त्यास आपण सर्वांनी मान्यता दयावी असे आवाहन केले त्यास उपस्थित सर्व सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.

**२. सभासद कल्याण निधी योजनेखाली मयत कर्जदार सभासदांना रु. १०,०००/—पावेतोची कर्ज माफी दिलेल्या प्रकरणांना मंजूरी देणे**

सभासद कल्याण निधी योजनेअंतर्गत बॅंकेचे मयत कर्जदार थकबाकीदारांना रु. १०,०००/— पर्यन्तची खालील कोष्टकाप्रमाणे सभासद कल्याण निधी मधून रक्कम

वर्ग करुन उर्वरित रक्कम त्यांचेकडून भरुन घेवून कर्जखाती बंद केल्याची माहिती सभेला देण्यात आली.

| **अ.नं.** | **कालावधी** | **खाते संख्या** | **जमा दिलेली रक्कम रुपये** |
|---|---|---|---|
| १ | ०१.०४.२०१६ ते ३१.०३.२०१७ | ९ | ७३१५५/— |

त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार त्याला मंजूरी देण्यात आली

**३. वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी आलेली पत्रे —**

वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी आलेली पत्रे व त्यांस बँकेने तयार केलेली उत्तरे बँकेचे मुख्य लेखापाल संघमित्रा काळे यांनी वाचून दाखविली. त्या बाबत सर्व सभासदांनी समाधान व्यक्त केले.

४. मा.शेलार सो.यांनी सुचविले की वसूली जोरात करावी ढोल ताशा वाजवून वसूली करावी.

५. श्री विजय बोरा मागील काळात बँकेला रू ०५ लाख दंड झाला तो वसुल का केला नाही. यावर प्रशासक साहेबांनी सांगितले की कारवाई चालू आहे.

६. बँकेचे एनपीए वाढीबाबत चर्चा झाली. याप्रमाणे अन्य सभासदांनीही चर्चेत भाग घेतला व त्यांच्या प्रश्नांना मा.प्रशासकांनी समर्पक उत्तरे दिली. मा.प्रशासक सो यांनी सर्वांना विनंती केली की सर्व सभासदांनी बॅकेला पुढे नेण्यासाठी मदत करावी. मा. प्रशासक साहेबांनी बँकेच्या कर्जाचे व्याजदर इतके कमी केले आहेत की कोणत्याही बँकेने आत्ता पर्यंत इतकी कपात केलेली नाही. त्यामुळे आपले सर्व सभासद खुश आहेत. नविन व्याजदराचा चार्ट वाचून दाखविण्यात आला आणि सर्व कर्जदारांना आपल्या बँकेमार्फत जास्तीत जास्त कर्ज घेण्याचे आवाहन केले.

सुचक — श्री.भणगे माधवराव
अनुमोदक — श्री.बोडके सुधिर
ठराव सर्वानुमते मंजुर

येणेप्रमाणे विषय पत्रिकेनुसार सभेचे कामकाज पूर्ण झाले.

उपस्थित सभासदांनी चर्चेत सहभाग नोंदविल्याबद्दल आणि सहकार्य केल्याबदद्ल बँकेचे प्रशासक मा.श्री. भोरिया साहेब यांनी सभासदांचे आभार मानले. त्यानंतर सामुदायिक राष्ट्रगीत म्हणून सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

मा.श्री. भोरिया साहेब यांनी सभेला उपस्थित सभासद, कर्मचारी आणि सर्व मान्यवरांना सभास्थानी असलेल्या स्नेह भोजनाचा आस्वाद घेण्याची विनंती केली. तसेच कोणीही जेवल्या शिवाय सभास्थान सोडू नये असा आग्रह केला. याप्रमाणे सभा संपन्न झाली.

स्नेह भोजनानंतर सर्वसभासदांना प्रशिक्षणात सहभागी होण्याबाबत विनंती केली.

**शंकर वि फुटाणे**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**जे.बी.भोरिया**
**प्रशासक**